UGC Approved Refereed Journal Jr.No.62759

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2018

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Bharatiya Vidya Mandir Amravati's
**Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist.Amravati**
**(Affiliated To Sant Gadge Baba Amaravati University,Amravati )**

**One Day National Conference**
**On**

# Impact of Demonetization on Indian Economy

24th February 2018




**Principal**
G.S.Meshram

**Chief Editor**
Prof. Virag Gawande

**Editor**
Dr. Lajwanti R.Tembhurne

**Organized By**
**Department Of Economics**
Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist. Amravati
In Collaboration With
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati

14) निश्चलनीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास || 51
प्रा. पंढरी जी. मोरे., ओंकारनगर नागपूर.

15) विमुद्रीकरण आणि काळापैसा || 53
प्रा.हेमराज चौधरी, आर्वी जि. वर्धा.

16) निश्चलनीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम || 56
डॉ. अे. जी. वानखडे, रिसोड जि. वाशिम

17) सर्वसमावेशी शाश्वत विमुद्रिकरण आवश्यक || 58
प्रा. रविंद्र बा.शेंडे, वरोरा.

18) निश्चलनीकरण आणि भ्रष्टाचार आणि काळापैशाचे प्रतिबंध || 61
प्रा. डॉ. व्ही.व्ही. लाडे, तुकूम, चंद्रपूर

19) विमुद्रिकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम || 65
प्रा. डॉ. रवि सोरते, पवन महंत

20) विमुद्रीकरण आणि सामान्य जनता || 69
सौ. दिपाली पडोळे, उत्तमनगर अमरावती

21)नोट बंदीचे विधायक व विघातक परिणाम || 72
प्रा. डॉ. मंमता आर. साहु, रोहणा, जि. वर्धा

22) विमुद्रीकरण : एक आर्थिक/ अध्ययन || 74
प्रा. डॉ. लाजवंती आर. टेंभुर्णे, मोर्शी

23) विमुद्रीकरणाचा सर्वसामान्य व्यक्तिंवर परिणाम || 77
प्रा.जगदीश वाटामोडे, नागपूर

24) विमुद्रीकरण आणि काळ्या पैशावरील त्याचे परिणाम || 80
ज्ञानेश्वर बापूराव जांभुळे, परेल मुंबई

25) नोटबंदीचे उद्देश, फायदे / नुकसान || 83
प्रा. एम. यु. अर्जुने, नेर

26) Demonetization Special effect on Banking sector [Bank loan] || 86
Dr. Jyoti Pande [ Rai], Distt. – Bhandara

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

आवश्यक वातावरण निर्मितीवरही भर द्यायला हवा.

संदर्भ :–

- छ.स्पेज
- भारतीय अर्थव्यवस्था — लाल ॲण्ड लाल
- भारतीय अर्थव्यवस्था — रूद्र दत्त ॲण्ड सुंदरम्
- प्रतियोगिता दर्पण :
- Economics Weekly :

❑❑❑

15

# विमुद्रीकरण आणि काळापैसा

**प्रा.हेमराज चौधरी**
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, आर्वी जि. वर्धा.

**********

मागील काही वर्षापासून भारतीय अर्थव्यवस्थेला काळया पैशाचे ग्रहण लागले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील काळा पैसा उत्तरोत्तर वाढत जावून अर्थव्यवस्था खिळखिळी झाली आहे आणि त्यातून एक समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. करचुकवेगीरी, भ्रष्टाचार, अवैध व्यवहार, फसवणूक यातून हा काळा पैसा तयार झाला आहे आणि त्यातून बरेच अनिष्ठ परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर घडून आलेत आणि घडून येत आहे. त्या दृष्टीकोनातूनच केंद्र सरकारने ८ नोव्हेंबर २०१६ रोजी एक ऐतिहासिक निर्णय घेवून चलनातून ५०० व १००० रुपयाच्या नोटा बाद केल्या त्याचा काळया पैशावर काय परिणाम झाला? काळा पैसा खरोखरच दृष्टीपथात आला काय? या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधनलेख मांडण्यात आला आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

- काळा पैशाविरोधात यापुर्वी योजलेल्या उपाययोजना अभ्यासणे.
- क्ष्वमुद्रीकरणाचा काळया पैशावरील व अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासणे.
- काळा पैसा कमी करण्यासाठी विमुद्रीकरणाबाबत प्रभावी उपाययोजना सूचविणे.

**संशोधन पद्धती :**

संशोधनासाठी दुय्यम तथ्यांचा वापर केला आहे.

ज्या पैशावर प्राप्तीकर आणि इतर कर भरले नाहीत, असा पैसा म्हणजे काळा पैसा होय. हा काळा पैसा देशात आणि विदेशात साठवला जातो. ज्या देशात शुन्य कर आहे, त्या देशात एखादी कंपनी

स्थापन करुन हा काळा पैसा पांढरा केला जातो. थोडक्यात या पैशावर कर भरला जात नाही, त्यामुळे सरकारचे मोठे नुकसान आणि प्रामाणिकपणे कर भरणाऱ्यांवर अप्रत्यक्षपणे अन्याय होतो. हा काळा पैसा रोख स्वरुपात साठवला जातो किंवा स्थावर मालमत्ता, सोने किंवा इतर मालमत्तांमध्ये दुसऱ्यांच्या नांवे गुंतविला जातो. अशाप्रकारे हा पैसा परत पांढरा केला जातो आणि चलनात आणला जातो.

भारतामध्ये विविध स्वरुपात हा काळा पैसा साठवलेला तर आहेच. याशिवाय इतर देशांमध्ये सुद्धा भारतीयांनी काळ्या पैशाची साठवणूक केलेली आहे. २०१२ मध्ये जाहीर झाल्यानुसार २०१० मध्ये भारतीयांचे ९२.९५ बिलीयन रुपये स्विस बँकेत जमा होते. २०१५ मध्ये इंडियन एक्सप्रेस ने जाहीर केल्यानुसार जिनेव्हा शाखेत १००० च्या वर भारतीयांची खाती आहेत. २०१६ मध्ये उघडकीस आलेल्या पनामा पेपर घोटाळयात सुद्धा अनेक भारतीय मान्यवरांची नावे आहेत.

यावर उपाय म्हणून भारताचे पंतप्रधान माननिय नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी नोटबंदी जाहीर केली. त्यानुसार ५०० व १००० रुपयाच्या जुन्या नोटा चलनातून बाद केल्या. या नोटांचे मुल्य एकूण चलनाच्या ८६ होते. काळा पैसा शोधून काढणे, भ्रष्टाचार व नकली नोटा कमी करणे, आंतकवादी कारवायांसाठी वापरण्यात येणारा निधी गोठविणे ही त्यामागची उद्दिष्टये होती.

**काळया पैशाविरोधातील यापुर्वीच्या उपाययोजना**

• काही विशिष्ट रकमेनंतरच्या व्यवहारासाठी PAN क्रमांक अत्यावश्यक करण्यात आला. त्यामुळे प्राप्तीकर खात्याला खातेदाराच्या खात्यातील अतिरिक्त रकमेची माहिती मिळविणे सोपे झाले.

• उद्गम कराची व्याप्ती वाढविण्यात आली. यामध्ये सहकारी बँक, पतसंस्था, विमा योजनेमध्ये मिळणारे पैसे जे करपात्र आहे, त्यावर उद्गम कर कापला जातो. त्यामुळे उत्पन्न आणि उद्गम कर या दोहोंची माहिती प्राप्तीकर खात्याकडे जाते.

• काळया पैशाचा नवीन कायदा करण्यात आला त्यानुसार भारतात आणि भारताबाहेर मिळविलेल्या उत्पन्नावर निवासी भारतीयाला कर भरावा लागतो.

• २०१६ मध्ये एक कायदा करून ज्यांच्याकडे अघोषीत उत्पन्न आहे, त्यांनी ते घोषीत करुन ४५ इतका कर, व्याज आणि दंड भरल्यास प्राप्तीकर कायदयातील दंड आणि अटक यातून सुट दिली जाईल.

काळया पैशाविरोधात अशाप्रकारच्या उपाययोजना करुनही भारतातील काळा पैसा अपेक्षेनुसार सरकारकडे जमा झाला नाही. त्यामुळे केंद्र सरकारने ८ नोव्हेंबर २०१६ रोजी नोटबंदीचा निर्णय घेतला त्यानुसार चलनातील ५०० व १००० रुपयाच्या नोटा चलनातून हद्दपार केल्या.

**भारतीय अर्थव्यस्थेवरील — तात्कालिक परिणाम**

नोटबंदीच्या निर्णयाने तात्काळरित्या काही परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर घडून आले.

• एकूण मुल्यातील ८६ मुल्याच्या नोटा चलनातून बाद झाल्यामुळे दैनंदिन व्यवहारांसाठी पैसा कमी पडू लागला. त्यामुळे क्रयशक्तीत घट होवून मागणी घटली.

• पैसा काढण्यासाठी बँकेत लोकांच्या रांगा लागल्या त्यामुळे मागणीनुसार पैसा पुरविणे अशक्य झाले.

• क्षवमुद्रीकरणाच्या सुरुवातीच्या ५० दिवसात जवळपास १०० लोकांचा बळी गेला.

• कृषी क्षेत्रात रब्बी हंगामामध्ये बि—बियाणे, किटकनाशके, खते खरेदी करतांना शेतकऱ्यांचे हाल झाले.

• शेतमालाचे भाव गडगडले. महाराष्ट्र व कर्नाटकमधील शेतकऱ्यांनी कांदे व टोमॅटो रस्त्यावर फेकून दिले.

• जिल्हा मध्यवर्ती बँकाच्या कामकाजावर बंदी आणल्याने ग्रामीण भागातील परिस्थिती आणखीच बिघडली.

• निर्मिती क्षेत्राचा विकासदर कमालीचा घटला.

• लघु उद्योग, कुटिर उद्योग, दुग्ध उद्योग, पोल्ट्री उद्योग, हस्तकला उद्योग यातील कामगार बेरोजगार झाले.

याशिवाय नोटबंदीच्या काळातच स्टेट बँक सहित काही खासगी बँकानी भ्रष्ट मार्गाने श्रीमंत लोक, पुढारी, काळापैसावाले यांना कोटयवधी रुपयांच्या जुन्या नोटा नवीन नोटांमध्ये बदलवून दिल्यात. अनेक ठिकाणी बनावट नोटांची छपाई झाल्याचे उघडकीस आले.

**विमुद्रीकरणाचे उपकारक परिणाम :**

विमुद्रीकरणामुळे काही चांगले परिणाम घडून आले वा घडून येण्याची आशा निर्माण झाली.

- दहशतवादी कारवायांसाठी होणारा अर्थपूरवठा, अमली पदार्थ व मानवी तस्करीत घट झाली.
- प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना राबवून सरकारने काळापैसा धारकांना योजनेत सहभागी होण्याचे आव्हान केले. या योजनेला काही प्रमाणात प्रतिसाद मिळाला.
- म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणाऱ्यांच्या संख्येत आणि गुंतवणूक रकमेत वाढ झाली.
- दोन लाखांच्या वर शेल कंपन्यांचा छडा लावण्यात आला.
- करमहसुलात वाढ घडून आली.
- करदात्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ घडून आली.
- दहशतवाद्यांना नकली नोटांद्वारे होणारा अर्थपूरवठा रोखला गेला.
- जनधन खाते धारकांची संख्या वाढली.
- जनधन खात्यांमधली रक्कम वाढली.
- रिअल इस्टेट क्षेत्रात पारदर्शकता आली.
- नकली नोटा चलनातून बाद झाल्यात.

**काळा पैसा व विमुद्रीकरणाच्या यशस्वीतेसाठी प्रभावी उपाययोजना :**

- काळा पैसा बाळगणाऱ्या विरोधात कठोर कायदे करुन कठोर शिक्षा व आर्थिक दंडाची तरतूद करणे.
- नवीन नोटांची छपाई अशापद्धतीने करणे जेणे करुन नकली नोटा चलनात येणार नाही.
- रोखरहित व्यवहार करण्यास प्रोत्साहन देणे.
- विशिष्ट रकमेपेक्षा जास्त रकमेचे व्यवहार रोखीने करण्यास मज्जाव करणे.
- विमुद्रीकरणानंतर चलनात आणलेली २००० ची नोट रद्द करणे, त्याऐवजी कमी मुल्याचा नोटा चलनात आणणे.
- देशातील व विदेशातील काळापैसा व करचूकवेगीरी करणाऱ्यांची नावे प्रसारमाध्यमांवर जाहिर करणे.
- भविष्यात विमुद्रीकरण करतांना पुर्वनियोजन करुन विमुद्रीकरणाचा निर्णय घेणे.

थोडक्यात काळा पैसा आणि बेकायदेशीर व्यवहारांना आटोक्यात आणण्यासाठी विमुद्रीकरण करण्यात आले. काळा पैसा रोखण्यासंदर्भात २०१४ च्या अर्थसंकल्पातील विशेष अन्वेषक पथकनिर्मिती, काळा पैसा आणि कर आकारणी कायदा –२०१५, बेनामी व्यवहार कायदा–२०१६, स्वित्झर्लंड सोबतचा माहिती विनिमय करार, उत्पन्न प्रकटीकरण योजना इ. उपाय योजनांचा समावेश होतो. एवढया उपाययोजना करुनही काळया पैशावर नियंत्रण येत नसेल तर विमुद्रीकरणासारखा कठोर निर्णय सरकारला घ्यावा लागतो. यापुर्वी १९४६ आणि १९७८ ला भारतात विमुद्रीकरण झाले होते, सामान्य माणसाच्या जीवनावर त्याचा फारसा परिणाम झाला नव्हता. परंतु ८ नोव्हेंबर २०१६ च्या विमुद्रीकरणाच्या निर्णयाने सर्वसामान्यांच्या जीवनावर खोलवर परिणाम झाला. तरीही काही सकारात्मक गोष्टी घडून येण्यास निश्चितच वाव आहे. नोटबंदीनंतरच्या सुरुवातीस रब्बी हंगामात पेरणीखालील क्षेत्र साडेसहा टक्क्यांनी वाढले होते. १५ महिन्यापुर्वीचा विमुद्रीकरणाच्या परिणामाचा विचार करता आज भारताच्या अर्थव्यवस्थेबाबत बऱ्यापैकी आशावादी दृष्टीकोन निर्माण झाला आहे. अनिश्चिततेचा पदर पुर्वीपेक्षा नक्कीच कमी झाला आहे. नोटबंदीने दिलेला मनस्ताप आणि यातना हळूहळू विसरल्या जात आहेत, भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधीचा जागतिक मुद्रानिधीचा दृष्टीकोन सकारात्मक बनला आहे. मूडीज कडून उंचावले गेलेले पतमानांकन आणि जागतिक बँकेकडून व्यापार–व्यवसायाच्या सुलभतेसाठीच्या दर्जामध्ये केल्या गेलेल्या वाढीने अर्थव्यवस्थेला शाबासकीची थाप मिळाली आहे. बँकाच्या पतपुरवठयातील वाढीची चिन्हे, निर्यात कामगीरीमध्ये झालेली अल्प सुधारणा, पायाभूत सुविधांवरील वाढीव खर्च, गृहनिर्माण कार्याला चालना देण्यासाठी चालविलेली धडपड या गोष्टी निश्चितच मागणीमध्ये वाढ घडवून आणेल.

**संदर्भसूची –**


- ☐ अर्थसंवाद त्रैमासिक: आणि केन्सच्या अर्थशास्त्राला तडा गेला, एम.एन.शिंदे (मराठी अर्थशास्त्र परिषद एप्रिल–जून २०१७)
- ☐ विद्यावार्ता जर्नल – विमुद्रीकरण : रोकड विरहित अर्थ व्यवस्था आणि किरकोळ व्यापार – वसुंधरा साळुंखे ऑक्टोबर २०१७
- ☐ दैनिक लोकसत्ता – काळा पैसा, प्राप्तीकर कायदा आणि २०१६, प्रविण देशपांडे, ३० डिसेंबर २०१६.